# डीं.सी.पी.एस. बाबत अतिशय महत्त्वाची सूचना

# काळजीपूर्वक वाचावे

# वेतन देयक तयार करण्याची सुलभ पध्दत

वेतन देयक सुलभतेने तयार करण्याकरीता आणि वेतन देयके व परिभाषित अंशदान निवृत्ती वेतनयोजनेखाली अनुसूची यातील रकमेमधील तफावत दूर करण्याकरीता, **वेतन देयक तयार करण्यापूर्वी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेखालील कपात करुन कोषागारांकडे पाठविण्याची पध्दत (Validation) बंद करण्यात आली** असून, वेतन देयक तयार करण्याच्या कार्यपध्दतीमध्ये काही बदल करण्यात आले आहेत. परिभाषित अंशदान निवृत्ती वेतनयोजनेखालील अंशदानाची अनुसुची कोषागारांना पाठविल्याशिवाय आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या सहाय्यकास वेतन देयक तयार करणे सुलभ होईल. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे सहाय्यकाने प्रणालीवर वेतन देयकास चाप लावून (Lock) प्रमाणक क्रमांक व दिनांक टाकल्यानंतर परिभाषित अंशदान निवृत्ती वेतनाची अनुसूची **आपोआप** प्रणालीव्दारे कोषागारास पाठविली जाईल.

वेतन देयक तयार करण्याबाबत अनुसरावयाची कार्यप्रध्दती पुढील प्रमाणे:-

१. परिभाषित अंशदान निवृत्ती वेतनाचे अनुसूची, वेतन देयक कोषागारास सादर करण्याखेरीज वेतन देयक तयार करता येवू शकेल.

२. वेतन देयकामध्ये संबंधित महिन्याचे मुळ वेतन गृहित धरून परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेखालील संबंधित महिन्याच्या नियमित अंशदानाची रक्कम आपोआप परिगणीत होईल.

३. एक महिन्यापेक्षा कमी कालावधीचे वेतन व त्या अनुषंगाने परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेखालील अंशदान काढावयाचे असल्यास त्याबाबत “Broken Period Pay” या मेनूअंतर्गत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

४. परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेखालील अंशदान संदर्भात मागील महिन्यांची वसूली, महागाई भत्त्याची थकबाकी/ वेतनाची थकबाकी या संदर्भातील अंशदानाची वसूली करण्यासाठी “DCPS Delayed/DA Arrears/Pay Arrears” ह्या मेन्यू अंतर्गत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर मेन्यू अंतर्गत उपरोक्तबाबतची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेखालील अंशदानाची वसूली आपोआप वेतन देयकामध्ये दिसून येईल.

आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना दिनांक ०८/०९/२०१२ पासून उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करता येऊ शकेल.

दिनांक ०७/०९/२०१२ पर्यंतच्या देयकांची स्थिती खालीलप्रमाणे असल्यास पुढे नमूद केलेल्या तक्त्यातील उपाययोजनांचा आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी अवलंब करावा.

| अ.क्र. | परिस्थिती | काय करावे? |
|---|---|---|
| १) | DCPS Contributions (Regular/Delayed/DA Arrear/Pay Arrear) याचे अनुसूची आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या लॉगइनमध्ये प्रलंबित असल्यास | आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे सहाय्यक उपरोक्त टप्प्यांचा अवलंब करून DCPS Contributions (Regular/ Delayed/ DA Arrear/Pay Arrear) यामध्ये बदल करुन प्रणालीव्दारे वेतन देयक निर्मित / पुनर्निमित करु शकतील. |
| २) | DCPS Contributions (Regular/Delayed/DA Arrear/Pay Arrear) याची अनुसूची कोषागारांच्या लॉगइनमध्ये प्रलंबित असून वेतन देयक तयार केले नसल्यास | |
| ३) | वेतन देयक तयार झाल्यानंतर प्रमाणक क्रमांक व दिनांक टाकल्यानंतर चाप (Lock) केले नसल्यास | |
| ४) | DCPS Contributions (Regular/Delayed/DA Arrear/Pay Arrear) याची अनुसूची आहरण व संवितरण अधिकारी किंवा कोषागारांने नाकारल्यानंतर सदर अनुसूची “View Rejected Contributions” या मेन्यू अंतर्गत दिसून येत असतील | |
| ५) | वेतन देयक तयार झाल्यानंतर प्रमाणक क्रमांक व दिनांक टाकल्यानंतर चाप (Lock) केले असल्यास | या प्रकारच्या वेतन देयकाकरिता कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. |

TATA Consultancy Services

महत्त्वाचे..
कृपया नोंद् घ्यावी -

अ) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेखालील वजाती वेतन देयकामध्ये दिसण्याकरता खालील प्रमाणे संबंधित कर्मचाऱ्यांस मॅप करावे.

DDO login > Work list > Payroll > Dept. Eligibility for Allowances and Deductions and

DDO Assistant login > Work list > Payroll > Employee Eligibility for Allowances and Deductions.

हे न केल्यास – "No Records Found" in "DCPS Delayed/DA Arrears/Pay Arrears" screen असा संदेश दिसून येईल.

ब) कोषागारांनी कोषागार लॉगईन मधून पूर्वीच्या महिन्यांचे परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेखालील अंशदान मंजूर केल्याशिवाय पुढील महिन्यांचे वेतन देयक प्रणालीद्वारे तयार होऊ शकणार नाही.

क) सर्व कोषागारांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त **ब** मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे आपल्या स्तरावरील प्रशासकीय कार्यवाही त्वरित पूर्ण करावी, जेणे करून आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना किंवा त्यांच्या सहाय्यकाना पुढील महिन्यांचे वेतन देयक विहित मुदतीत प्रणालीद्वारे तयार करणे शक्य होईल व त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांचे वेतनाचे संवितरण करण्यास विलंब होणार नाही.

## गणेशउत्सवाच्या प्रसंगी वेतन देयक तयार करण्याच्या सुलभ पध्दतीचा अवलंब करुन वेतन देयके तयार करुया.

## आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा देवून अशी आशा व्यक्त करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या सल्ल्याने तयार केलेल्या वेतन देयके तयार करण्याच्या सुलभ पध्दतीचा उपयोग अडचणीविरहित वेतन देयके तयार करण्यासाठी होईल.

## आमच्या सर्वोत्तम सेवेचे आश्वासन देत आहोत.

## टाटा कन्सलटंसी सर्विसेस

TATA Consultancy Services

# Very Important Notice about DCPS
# Read Carefully

## Simplified Pay Bill Generation Process

In order to make pay bill generation process more easy and to avoid mismatch in pay bills and DCPS schedules, we have made few changes in the pay bill generation process, **by removing DCPS validations before generating pay bill.** This will help DDO Assistants to generate the pay bill without forwarding DCPS contributions to Treasury in advance. All the DCPS Contributions (Regular/Delayed/DA Arrear/Pay Arrear) will get forwarded to Treasury **automatically** after locking the pay bill by DDO Assistants by entering voucher number and date.

Detailed steps are given below –

1. Pay bill should be generated without forwarding DCPS Regular Contributions to Treasury.
2. DCPS Regular Contributions will appear in pay bill automatically by assuming default basic salary.
3. Use "Broken Period Pay" screen if DCPS Regular Recovery is to be made for a period less than a month.
4. Use "DCPS Delayed/DA Arrears/Pay Arrears" screen in case of DCPS Delayed Recovery, DCPS DA Arrears and DCPS Pay Arrears. After saving the details, they will be reflected in pay bill.

- ✓ The above process must be followed by all DDOs from 08.09.2012.
- ✓ DDOs are requested to follow below solution, if their pay bills were in following stages as on 07.09.2012 -

| Sr. No. | Scenarios | What to do? |
|---|---|---|
| 1 | If DCPS Contributions (Regular/Delayed/DA Arrear/Pay Arrear) were pending with DDO | DDO Assistant may change DCPS Contributions (Regular/Delayed/DA Arrear/Pay Arrear) as said in steps above and generate / regenerate the pay bill. |
| 2 | If DCPS Contributions (Regular/Delayed/DA Arrear/Pay Arrear) were pending with Treasury and pay bill was not generated | |
| 3 | If pay bill was generated but not locked by entering voucher number and date | |
| 4 | If DCPS Contributions (Regular/Delayed/DA Arrear/Pay Arrear) were rejected by DDO or Treasury and were appearing in "View Rejected Contributions" | |
| 5 | If pay bill was generated and locked by entering voucher number and date | You need not do anything for this particular pay bill |

TATA Consultancy Services
TATA Consultancy Services

**Important...**
**Please Note –**

A. In order to reflect the DCPS components in pay bill, they need to be mapped from
DDO login > Work list > Payroll > Dept. Eligibility for Allowances and Deductions and
DDO Assistant login > Work list > Payroll > Employee Eligibility for Allowances and Deductions.
Otherwise, there will be message – "No Records Found" in "DCPS Delayed/DA Arrears/Pay Arrears" screen

B. DDO will not be able to generate the pay bill for next month, unless all the DCPS components for earlier month are approved by Treasury from Treasury login.

C. Treasuries are requested to complete the administrative process as mentioned in point number B above as soon as possible, so that DDOs will be able to generate the pay bills for next month on time and there will not be any delay in disbursement of salary to employees.

**On the auspicious occasion of Ganesh Utsav, let us start generating pay bills by this new simplified process.**

**We wish all the very best to all of you and hope that this simplified process designed in consultation with GoM will result in more hassle free generation of pay bills.**

**Assuring you of our best services**

**TATA Consultancy Services**

TATA Consultancy Services